आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in शुक्रवार दिनांक 06/03/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 76 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# हेच माझ्यासाठी सर्वात मोठे बळ..

## पुन्हा राज्यसभा खासदार झाल्यावर शरद पवारांची भावनिक पोस्ट

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**महाराष्ट्राच्या राजकारणात आज आणखी एक निवडणूक बिनविरोध पार पडली. राज्यसभेसाठी महाराष्ट्रातून सात खासदार जाणार आहेत. या जागांसाठी अनेकजण उत्सुक होते. यातील एक जागा महाविकास आघाडीला मिळाली तर इतर सहा जागी महायुतीने उमेदवार दिले होते. भाजपाकडून विनोद तावडे, रामदास आठवले, रामराव वडकुते, माया इवनाते; शिंदेसेनेच्या ज्योती वाघमारे आणि राष्ट्रवादी अजित पवार पक्षातून पार्थ पवार यांना राज्यसभा खासदारकीची उमेदवारी मिळाली.**



तर महाविकास आघाडीकडून ज्येष्ठ नेते शरद पवार यांना उमेदवारी देण्यात आली. सात जागांसाठी सात अर्ज आल्याने निवडणूक बिनविरोध होणार हे स्पष्ट झाले. प्रकृती अस्वास्थ्यामुळे शरद पवार स्वत: अर्ज भरण्यासाठी उपस्थित राहू शकले नाही. पण त्यांनी सोशल मीडियातून आपल्या भावना व्यक्त केल्या. आपल्या एक्स पोस्टमध्ये शरद पवारांनी लिहिले, "1967 पासून माझा लोकप्रतिनिधी म्हणून प्रवास सुरू झाला आणि आजपर्यंत तो अखंडपणे सुरू आहे. हा प्रदीर्घ प्रवास केवळ माझा नसून महाराष्ट्राच्या जनतेचा आहे, कारण त्यांनी दाखवलेल्या विश्वासामुळे आणि पाठिंब्यामुळेच हा संसदीय प्रवास कधीही खंड न पडता पुढे सुरू ठेवणे मला शक्य झाले. 1967 मध्ये प्रथम महाराष्ट्रात विधानसभेवर निवडून जाण्याची संधी मिळाली.सार्वजनिक जीवनात आणि राजकारणात सातत्याने काम करत असताना लोकांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाच्या बळावर राज्यात मंत्री, मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेता अशा विविध जबाबदाऱ्या पार पाडण्याची संधी मिळाली. तसेच केंद्रात संरक्षणमंत्री आणि दहा वर्षे कृषीमंत्री म्हणून काम करण्याची जबाबदारीही मला मिळाली. या सर्व जबाबदाऱ्या पार पाडताना महाराष्ट्रासाठी तसेच देशासाठी सकारात्मक काम करता आले, यामागे जनतेचा विश्वास हेच माझ्यासाठी सर्वात मोठे बळ राहिले आहे."

# पार्थ पवार राज्यसभेचे खासदार निश्चित !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासह दिवंगत नेते अजित पवार यांचे पूत्र पार्थ पवार यांचा राज्यसभेसाठी आज (05 मार्च) अर्ज सादर करण्यात आला. विधान भवन मुंबई येथे यानिमित्ताने दोन्ही राष्ट्रवादीच्या नेत्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. यानंतर त्यांनी सोशल मीडियावर त्यांची प्रतिक्रिया दिली आहे.**



राष्ट्रवादी काँग्रेस परिवारातील ज्येष्ठ नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी सर्वांचे मनापासून आभार मानतो असे पार्थ पवार म्हणाले आहेत. हा क्षण माझ्यासाठी केवळ राजकीय टप्पा नसून मोठ्या जबाबदारीची जाणीव करून देणारा असल्याचे पार्थ पवार म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेस परिवारातील ज्येष्ठ नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी सर्वांचे मनापासून आभार मानतो असे पार्थ पवार म्हणाले आहेत. हा क्षण माझ्यासाठी केवळ राजकीय टप्पा नसून मोठ्या जबाबदारीची जाणीव करून देणारा असल्याचे पार्थ पवार म्हणाले. माझे वडील, राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांनी आयुष्यभर जनतेच्या सेवेला प्राधान्य देत विकासाचे राजकारण कसे करावे, याचा आदर्श घालून दिला. त्यांच्या कार्यातून मिळालेली प्रेरणा आणि त्यांनी दिलेले संस्कार हेच माझ्यासाठी पुढील वाटचालीचे मार्गदर्शन ठरतील.

दादांनी जपलेली जनतेशी असलेली नाळ, प्रामाणिकपणे काम करण्याची वृत्ती आणि महाराष्ट्राच्या प्रगती तसेच विकासासाठीची तळमळ या मूल्यांना पुढे नेण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करेन. जनतेच्या अपेक्षा, कार्यकर्त्यांचा विश्वास आणि पक्षाची विचारधारा यांना न्याय देत देश आणि महाराष्ट्राच्या प्रश्नांना प्रभावीपणे मांडण्यासाठी मी कटिबद्ध राहीन.

### निवडणूक बिनविरोध होणार

राज्यसभेच्या निवडणुकीत अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी ट्विस्ट आला आहे. दोन उमेदवार देण्याची चर्चा असलेल्या शिंदेंच्या शिवसेनेने अखेर एकच उमेदवार दिला आहे. ज्योती वाघमारे यांनी अर्ज सादर केला असून रोहित टिळकांचा उमेदवारी अर्ज भरण्यात आला नाही. त्यामुळे राज्यातील सात जागांसाठी अखेर सात अर्ज दाखल झाल्याने ही निवडणूक बिनविरोध होणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. राज्यसभेच्या निवडणुकीसाठी भाजपकडून चार, राष्ट्रवादीकडून एक आणि शिवसेनेकडून एक असे सहा अर्ज दाखल झाले आहेत. तर दुसऱ्या बाजूला महाविकास आघाडीकडून शरद पवारांचा अर्ज दाखल झाला आहे. त्यामुळे ही निवडणूक आता बिनविरोध झाल्याचं समोर आलं आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शुक्रवार दिनांक 06/03/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# 'तलास' चित्रपटातील धम्माल हळदी गीताचा दिमाखदार प्रकाशन सोहळा संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मराठी सिनेसृष्टीतील आशयघन आणि उत्कंठावर्धक चित्रपटांनी नेहमीच प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. 'तलास' हा आगामी मराठी चित्रपटही प्रेक्षकांच्या मनात कुतूहल जागविणारा आहे. या चित्रपटाच्या कथानकात नेमके काय दडलेय याची कल्पना शीर्षकावरून अजिबात येत नाही. याउलट चित्रपटाचे शीर्षक उत्सुकता वाढविण्याचे काम करणारे आहे. नुकतेच या चित्रपटातील धम्माल गाण्याचे प्रकाशन करण्यात आले आहे.**




निर्मात्या दीपा सावंत-खोत यांनी दीपतारांगण क्रिएशन्सच्या बॅनरखाली 'तलास' या रहस्यमय-रोमांचक चित्रपटाची निर्मिती केली आहे. 'तलास'मध्ये प्रेक्षकांना अखेरपर्यंत खिळवून ठेवणारी मर्डर मिस्ट्री आहे. रहस्यमय घडामोडींची गुंतागुंत आणि अखेरीस होणारी रहस्याची उकल प्रेक्षकांना रोमांचक अनुभव देणारी आहे. उदय गणपत जाधव यांनी या चित्रपटाचे अभ्यासपूर्ण दिग्दर्शन केले असून, कथा आणि पटकथालेखनही त्यांनीच केले आहे. संवादलेखनाची जबाबदारी रुपाली कुटे यांनी सांभाळली आहे. गीतकार विजय गाडेकर यांनी या चित्रपटासाठी गीतलेखन केले असून, संगीत दिग्दर्शनही त्यांची केले आहे. दादर क्लबमध्ये आयोजित करण्यात आलेल्या दिमाखदार सोहळ्यात 'तलास' चित्रपटामधील धम्माल गाण्याचा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. हळदीच्या सोनसळी रंगात न्हालेलं हे ग्लॅमरस, जल्लोषमय आणि रॉयल थाटात साकारलेलं गीत प्रकाशित करण्यात आले. 'या गो बायांनो हळद घेऊनशी...' या गीतकार-संगीतकार विजय गाडेकर यांच्या लेखणीतून अवतरलेल्या आणि संगीतबद्ध केलेल्या गाण्यावर गौतमी पाटीलने नृत्य केले असून नृत्यदिग्दर्शन नरेंद्र पंडित यांनी केले आहे. महाराष्ट्राची लाडकी गायिका वैशाली सामंत यांनी हे गाणे गायले आहे.

या चित्रपटात चिन्मयी सुमित, गणेश यादव, प्रणव रावराणे, राहुल पाटील, पूजा जैस्वाल, निलेश भेरे, वेदांत खोत, रेखा राणे, अजय पाध्ये आणि गौतमी पाटील आदी कलाकार आहेत.

# पीसीयू मध्ये क्रेस्ट २०२६ सायबर साक्षरता स्पर्धा आणि बक्षीस वितरण संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी, पुणे ऑनलाइन चा वापर आता दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. त्यामुळे संसाधने, श्रम, वेळ, पैसा याची बचत होऊन विक्री व नफ्यामध्ये मोठी वाढ होते. परंतु याचा सुरक्षितपणे वापर करण्यासाठी सायबर सुरक्षितते विषयी सर्वसामान्य नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण होणे आवश्यक आहे. या माहितीजाला मध्ये खरे आणि खोटे ओळखता आले पाहिजे. यासाठी पिंपरी चिंचवड विद्यापीठाने आयोजित केलेली स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी निश्चितच उपयोगी ठरेल. विद्यार्थ्यांनी मजबूत नेटवर्क विकसित करून टीमवर्क मध्ये काम केले पाहिजे. सायबर सुरक्षा ही मूलभूतपणे एक सहयोगी स्वयंशिस्त आहे असे प्रतिपादन सायबर सुरक्षा सहकार्य अध्यक्ष आणि आयक्यूएसएसचे सीईओ डॉ. हेरॉल्ड डीकोस्टा यांनी केले.**



पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) साते, वडगाव मावळ, पुणे येथे स्कूल ऑफ कम्प्युटर एप्लीकेशन्सच्या सायबर सुरक्षा क्लब अंतर्गत भारतातील सर्वात मोठी राष्ट्रीय स्तरावरील अंतर महाविद्यालयीन "क्रेस्ट 2026 - सीटीएफ कॅप्चर द फ्लॅग" ही स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत देशभरातील 2000 पेक्षा अधिक आयआयटी, एनआयटी आणि सरकारी अभियांत्रिकी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यावेळी हॅक्टिफाय सायबर सिक्युरिटीचे संस्थापक सीईओ डॉ. रोहित गौतम, पीसीयू कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, हॅक्टिफाय सायबर सिक्युरिटी कंपनीच्या सीईओ डॉ. शिफा सायकलवाला, कुलसचिव डॉ. अनिल माहेश्वरी आणि एचओडी डॉ. कमलेश मेश्राम आदी उपस्थित होते. डॉ. शिफा सायकलवाला यांनी सांगितले की, सायबर सुरक्षेत महिलांचा सहभाग अधिक गरजेचा आहे. यामध्ये महिलांना मोठी संधी आहे. त्यांनी आता नेतृत्व करण्यासाठी सिद्ध झाले पाहिजे. त्यासाठी सक्षम भूमिका घ्यावी आणि अशा विशाल व्यासपीठावर सक्रियपणे सहभागी होण्याचे आवाहन केले. हे व्यासपीठ केवळ महाविद्यालयीन स्पर्धांपुरते मर्यादित नसून प्लेसमेंट, मशीन टेस्ट, सायबर डिफेन्स भूमिका आणि राष्ट्रीय सुरक्षा मोहिमांसाठी मोठी संधी आहे. पीसीयू कुलगुरु डॉ. संतोष सोनावणे म्हणाले की, सायबर सुरक्षा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये सातत्याने कौशल्य विकास करण्याचे आवश्यक आहे. प्र कुलगुरु डॉ. सुदीप थेपडे यांनी वेगाने बदलणाऱ्या डिजिटल जगात विद्यार्थ्यांनी आपले करिअर घडवण्यासाठी सज्ज रहावे असे आवाहन केले.

हॅक्टिफाय सायबर सिक्युरिटीचे संस्थापक सीईओ डॉ. रोहित गौतम यांनी सायबरस्पेसचा जबाबदारीने वापर केला पाहिजे. भारताच्या वाढत्या डिजिटल लँडस्केपला संबोधित करताना, त्यांनी उत्कटतेचे ध्येयात रुपांतर करण्याची गरज व्यक्त केली. सुरक्षित डिजिटल पायाभूत सुविधांद्वारे महाराष्ट्रातील ग्रामीण समुदायांना सक्षम बनवण्याच्या उद्देशाने प्रोजेक्ट दुर्गा सारख्या उपक्रम राबविण्यात येत आहे असे त्यांनी सांगितले. सुरक्षित डिजिटल भारत सुनिश्चित करण्यासाठी सायबर सुरक्षा जागरुकता प्रत्येक गावात पोहोचली पाहिजे यासाठी प्रयत्न केले जावेत असेही त्यांनी सांगितले.

डॉ. कमलेश मेश्राम म्हणाले की, पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीइटी) पिंपरी चिंचवड विद्यापीठ मध्ये "क्रेस्ट 2026 - सीटीएफ" अशा स्पर्धा, प्रदर्शन आणि उद्योग सहकार्याद्वारे एक मजबूत सायबर सुरक्षा मार्गदर्शन मंच कार्यरत राहील. पीसीयू विद्यार्थी प्रज्वल पवार, सोहम आहेर, गणेश रामावत, अथर्व जगदाळे, कौस्तुभ पाटील, कैफ तरसगर, ऋतुजा खोबरे आणि वैष्णवी शेट्टी यांनी सीटीएफ चॅलेंजेसचे डिझाईन, डेव्हलपमेंट, डिप्लॉयमेंट आणि कठोर चाचणी यामध्ये उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य दाखवले. त्यांच्या प्रयत्नांमुळे स्पर्धेसाठी सुरक्षित, सक्षम आणि राष्ट्रीय स्तराच्या मानकानुसार व्यावसायिक दर्जाचे प्लॅटफॉर्म तयार करण्यात यश आले. समन्वयक म्हणून डॉ. स्नेहांकिता मजलेकर यांनी काम पाहिले.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे. प्रथम क्रमांक :- घोष्ट बटालियन टीम, जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, वाघोली, पुणे; द्वितीय क्रमांक :- चक्रव्हू टीम, जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, वाघोली, पुणे; तृतीय क्रमांक :- नेट सेल्युथ टीम, सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, पुणे; चतुर्थ क्रमांक :- रेड फॉक्स टीम, सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, पुणे आणि पाचवा क्रमांक :- डायस्थोपियन डिबगर्स टीम, पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, आकुर्डी, पुणे या विजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक आणि एकूण सहा लाख रुपयांची बक्षीसे देऊन गौरविण्यात आले.या कार्यक्रमाला अल्टर सिक्युरिटी, ऑफसेक, एपीआयएसइसी विद्यापीठ, व्हाईट एरो टेक्नॉलॉजी, सायबर वार फेर लॅब, हॅक द बॉक्स मुंबई या कंपन्यांचे प्रायोजकत्व मिळाले. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी स्पर्धक विजेत्यांचे आणि मार्गदर्शक, आयोजकांचे अभिनंदन केले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
शुक्रवार दिनांक 06/03/2026
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# "तुका म्हणे धावा विठ्ठलाचा, तेथेच खरा आनंद साचा" - महापौर रवि लांडगे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांनी आपल्या अभंगरूपी वाणीमधून समाजाला भक्ती, समता, नैतिकता आणि मानवतेचा संदेश दिला. त्यांच्या विचारांनी वारकरी संप्रदायाला नवी दिशा मिळाली आणि समाजातील सर्व घटकांना एकत्र आणण्याचे कार्य घडले. संत तुकाराम महाराजांचे अभंग हे केवळ भक्तीचे स्त्रोत नसून समाजजागृतीचे प्रभावी माध्यम आहेत असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने जगद्गुरू संत तुकाराम महाराज बीजनिमित्त संत तुकारामनगर, पिंपरी येथील संत तुकाराम महाराज यांच्या मंदिरातील पुतळ्यास महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक शिक्षण मंडळाचे माजी उपसभापती मायला खत्री, माणिकराव आहेरराव संत तुकाराम महाराज प्रतिष्ठानचे नंदू कदम तसेच विविध सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

यानंतर निगडी येथील भक्ती-शक्ती समूहशिल्प येथील संत तुकाराम महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास देखील महापौर रवि लांडगे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसदस्य अमित गावडे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक उपस्थित होते.

यावेळी महापौर रवि लांडगे म्हणाले की, संत तुकाराम महाराजांनी आपल्या काव्य आणि अभंगांमधून समाजातील अंधश्रद्धा, अन्याय आणि भेदभाव यांना विरोध करत सत्य, सदाचार आणि परस्पर प्रेम यांचा संदेश दिला.

आजही त्यांच्या विचारांची प्रेरणा समाजाला योग्य दिशा देणारी आहे. संतांच्या शिकवणीमुळे समाजात सद्भावना आणि सामाजिक एकात्मतेची भावना दृढ होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

संत तुकाराम महाराजांच्या बीजनिमित्त त्यांच्या महान कार्याचे स्मरण करून त्यांच्या विचारांचे आचरण आपल्या दैनंदिन जीवनात करणे, हेच त्यांना खरे अभिवादन ठरेल, असे विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी यावेळी बोलताना सांगितले.

# फेक लिंकवर क्लिक करताच मोबाईल हॅक क्रेडिट कार्डमधून ६.४१ लाखांची फसवणूक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : फसव्या लिंकद्वारे मोबाईल हॅक करून क्रेडिट कार्डमधून तब्बल 6 लाख 41 हजार रुपये काढून घेतल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी दिघी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी अद्याप फरार आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे दाभाडे सरकार चौक परिसरातील अलंकार सोसायटी (फ्लॅट क्र. 706) येथे राहतात. दि. 13 ऑक्टोबर 2025 रोजी सकाळी सुमारे 9.20 वाजण्याच्या सुमारास त्यांच्या मोबाईलवर 9111807808 या क्रमांकावरून "REGALIAX MY CARD" या नावाने संदेश आला.

त्या संदेशातील लिंकवर क्लिक करून सहमती दिल्यानंतर त्यांच्या मोबाईलमध्ये "REGALIAX MY CARD" नावाचे ॲप डाउनलोड झाले.

या ॲपच्या माध्यमातून अज्ञात व्यक्तीने फिर्यादींचा मोबाईल हॅक करून त्याचा ॲक्सेस मिळवला. त्यानंतर फिर्यादींच्या मोबाईलमधील ONE CARD क्रेडिट कार्ड ॲपचा वापर करून त्यांच्या क्रेडिट कार्डमधून एकूण 6,41,000 रुपये परवानगीशिवाय काढण्यात आले. ही रक्कम "DRIVE TRACK PLUS CREDI HPCL" या नावाच्या खात्यावर ट्रान्सफर करून फिर्यादीची आर्थिक फसवणूक करण्यात आली.

या प्रकरणी दिघी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक 98/2026 दाखल करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 318(4), 319(2), 336(2), 3(5) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम 2008 मधील कलम 66 (C) व 66 (D) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी अद्याप अटकेत नसून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रहाणे करीत आहेत.

# नागरिकांच्या तक्रारीची तात्काळ दखल
## सागर कोकणे यांनी दिले तातडीचे आदेश

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक 27 मधील मधुबन कॉलनी, तापकीर मळा परिसरातील नागरिकांच्या ड्रेनेज समस्येची तात्काळ दखल घेत नवीन ड्रेनेज पाईपलाईन टाकण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. या कामासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक सागर कोकणे यांनी प्रशासनाला निर्देश दिले.**





मधुबन कॉलनी आणि तापकीर मळा येथील नागरिकांनी जुन्या व जीर्ण ड्रेनेज लाईनमुळे खराब पाण्याची गळती होत असल्याची तक्रार केली होती. या गळतीमुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून अस्वच्छतेची समस्या निर्माण झाली होती. त्यामुळे नागरिकांना आरोग्याच्या दृष्टीनेही त्रास सहन करावा लागत होता.

नागरिकांनी मांडलेल्या या समस्येची दखल घेत नगरसेवक सागर कोकणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश दिले. त्यानुसार जुनी ड्रेनेज लाईन काढून त्या ठिकाणी नवीन ड्रेनेज पाईपलाईन टाकण्याच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे. या कामामुळे परिसरातील दूषित पाण्याची गळती थांबून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. यावेळी सागर कोकणे यांनी सांगितले की, "परिसर स्वच्छ, निरोगी आणि सुरक्षित राहावा हा आमचा प्राधान्यक्रम आहे. प्रभागातील नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी नगरसेवक म्हणून मी सदैव कटिबद्ध आहे. नागरिकांनी दाखवलेल्या विश्वासाला न्याय देत परिसरातील मूलभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत राहणार आहे."

# शहरातील क्रीडा सुविधांचा कायापालट होणार
## सभापती कैलास कुटे यांच्याकडून पाहणी दौरा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विविध क्रीडा प्रकल्पांचा दर्जा सुधारण्यासाठी आणि नागरिकांना अद्ययावत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी क्रीडा समिती सभापती कैलास कुटे यांनी आज सविस्तर पाहणी दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे व सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. आज सकाळी 10:00 वाजता मोहननगर जलतरण तलावापासून या दौऱ्याची सुरुवात झाली. यावेळी त्यांच्यासोबत क्रीडा उपायुक्त पंकज पाटील, माजी नगरसेविका मीनल यादव, कार्यकारी अभियंता (क्रीडा स्थापत्य) विजय जाधव, कनिष्ठ अभियंता संदीप ठोकळे आणि प्र. क्रीडा अधिकारी रंगराव कारंडे उपस्थित होते.**



पाहणी दरम्यान सभापतींनी जलतरण तलावाच्या सुरक्षेवर विशेष भर दिला. तलावाच्या प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षक नेमणे, नागरिकांच्या सुविधेसाठी लॉकर बॉक्स उपलब्ध करून देणे आणि महिला प्रसाधनगृहात एक्झॉस्ट फॅन बसवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच, वीज बचतीसाठी या ठिकाणी सोलर पॅनल बसवण्यात येणार असून लहान मुलांच्या बेबी टँकभोवती सुरक्षिततेसाठी रेलिंग बसवण्याचे आदेशही त्यांनी दिले.

लॉन टेनिस कोर्टच्या शेजारील मोकळ्या जागेचा वापर करून तिथे क्रिकेटसाठी टर्फ तयार करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. मैदानाभोवतीच्या वाळलेल्या झाडांच्या फांद्या कापण्यासाठी उद्यान विभागाशी त्वरित पत्रव्यवहार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. रात्रीच्या वेळी खेळाडूंना सराव करता यावा यासाठी हायमास्ट दिवे बसवण्यावरही चर्चा झाली.

प्रबोधनकार ठाकरे व्यायामशाळेची पाहणी करताना, ओपन जिमची आवश्यक ती दुरुस्ती करण्याच्या सूचना सभापती कैलास कुटे यांनी दिल्या.

तसेच आकाश काळभोर व्यायामशाळेतील मोकळ्या जागेत नवीन बांधकाम किंवा शेड मारून जागेचा विस्तार करण्याचे नियोजन आहे.

काळभोर नगर येथील शंकर शेट्टी उद्यानासह शहरातील ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र आणि शेड उभारण्याचे प्रस्तावित आहे. उद्यानात ओपन जिमच्या दुरुस्तीसाठी ठेकेदाराचा क्रमांक दर्शनी भागात लावण्याचे आदेश देण्यात आले, जेणेकरून नागरिक तक्रार करू शकतील.

विशेष म्हणजे, बागेत बसवण्यात आलेल्या वाय-फाय बॉक्सची माहिती घेऊन नागरिकांना ती सुविधा उपलब्ध करून देणे आणि उद्यानांमध्ये तब्बल 1000 नवीन बाके (बेंच) खरेदी करण्याबाबत उद्यान विभागाला कळविण्यात आले आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968